दुरितांचे तिमिर जावो!

शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संचलित

## जवाहर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,अणदूर

ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद ४१३६०३

# राष्ट्रीय सेवा योजना

## सन २०२०—२१

# नियमित कार्यक्रम अहवाल


**प्रा. डॉ. सुर्यकांत आगलावे**

कार्यक्रमाधिकारी

**प्रा. डॉ. गुंडू राठोड**

कार्यक्रमाधिकारी

**डॉ.उमाकांत चनशेट्टी**

प्राचार्य

जवाहर महाविद्यालय, अणदूर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर

ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद 413603

## राष्ट्रीय सेवा योजना

नियमित कार्यक्रम सन 2020-21

## अहवाल

**शैक्षणिक वर्ष 2019- 20 प्रमाणे याही वर्षी आमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागास नियमित कार्यक्रमासाठी 200 स्वयंसेवक व वार्षिक विशेष शिबिरासाठी 100 स्वयंसेवकांची मंजुरी विद्यापीठाकडून प्राप्त झाली. कार्यक्रमाधिकारी म्हणून प्रा. डॉ. एस. डी. आगलावे व प्रा. डॉ. जी. टी. राठोड यांनी काम पाहिले. सन 2020-21 हे शैक्षणिक वर्ष covid-19 म्हणजेच कोरोना महामारी च्या सावटाखाली गेले.करोनाचा प्रादुर्भाव होऊ नये याची काळजी घेत राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रमांतर्गत आमच्या महाविद्यालयांमध्ये खालील कार्यक्रम घेण्यात आले.**

**१) अन्नदान** : कोरोनाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून मार्च 2020 पासूनच राज्यांमध्ये टाळेबंदी असल्यामूळे गरीब जनतेची उपासमार होऊ नये म्हणून राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने **कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. एस. डी. आगलावे** यांच्या हस्ते वत्सलानगर येथे दिनांक 31/05/ 2020 रोजी रु. 5000/- चे अन्नदान केले.




धन्यवाद अणदूरकर !
दैनिक दिव्य मराठी
आपण सुरक्षीत तर आपले गाव सुरक्षीत, घरातच राहूया कोरोनाला हरवूया
आम्ही धन्यवाद देतो त्या डॉक्टर्स, नर्सेस, पोलिस कर्मचारी, समाजसेवक, स्वच्छता कर्मचारी यांना जे आम्हाला सुरक्षीत ठेवण्यासाठी ढाल बनून उभे आहेत
आम्हाला अभिमान आहे तुमच्या सेवेचा!
फिनिक्स इंग्लिश स्कूल, अणदूर
ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद
श्री निलकंठेश्वर मठ, अणदूर
श्री खंडोबा देवस्थान श्री क्षेत्र, अणदूर
ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद
मा. दिलीपराव मोकाशे उपाध्यक्ष
मा. सुनील ढेपे सचिव
मा. प्रकाश मोकाशे अध्यक्ष
मा. बाबुराव न. चव्हाण
लॉकडाऊन यशस्वी करून कोरोनाला पळवून लावण्यासाठी शासन व प्रशासनास सहकार्य करा. जीवनावश्यक काही नाही, जीवन आवश्यक आहे तेव्हा कुटुंबाची काळजी घ्या.
मा. ना. मधुकरराव दे. चव्हाण
मा. सौ. जयश्री रा. स्वामी
प्रा. सूर्यकांत द. आगलावे
शारीरिक अंतर पाळा, मास्क वापरा, साबण, हॅन्डवॉश व सॅनिटायझरचा सतत वापर करा. घराबाहेर पडणे टाळा. लहान मुले व वृद्धांची काळजी घ्या.
श्री श्री गुरुकुल, अणदूर
रविशंकर विद्यामंदिर, अणदूर
श्री श्री शिक्षण संकूल
ग्रामपंचायत कार्यालय अणदूर
ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद
सर्व माननीय ग्रा. पं. सदस्य व कर्मचारी वर्ग
प्रा. डॉ. अनिता मुदकण्णा
मा. चंद्रकांत च. जिडगे
प्रा. सत्येंद्र राऊत
श्रीम. दीपमाला खडके
आर्यन सत्येंद्र राऊत
तुमच्यामुळेच आम्ही सुरक्षीत आहोत!
शासन व प्रशासन आपल्यासोबत आहे. तेव्हा संयमाने लॉक डा. सर्व नियमांचे पालन करीत एकमेकांना मदत करा. अफवावर विश्वास ठेवू नका. काळजी घेवू कोरोनाला पळवून लावू
मा. धनराज आ. मुळे
मा. सौ. वैशाली ध. मुळे















**२) आंतरराष्ट्रीय योग दिन :** दिनांक 21/06/2020 ला आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त कोरोना प्रादुर्भाव होऊ नये म्हणून योगा विथ फॅमिली करण्यासाठी

विद्यार्थ्यांना व जनतेला सोशल मीडियावरुन प्रबोधन करण्यात आले.





**3) वसंतराव नाईक जयंती :** दि. 01/07/2020 रोजी वसंतराव नाईक जयंती निमित्त महाविद्यालयांमध्ये प्रतिमापूजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाल्यानंतर वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाला शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. रामचंद्र (दादा) आलुरे व जवाहर विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. विवेकानंद स्वामी सर उपस्थित होते.





**४) मराठवाडा मुक्ती दिन :** दि.17/09/2020 रोजी मराठवाडा मुक्ती दिनानिमित्त महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रा. डॉ. अनिता मूदकन्ना यांचे मराठवाडा मुक्ती दिना मध्ये स्त्रियांचे योगदान या विषयावर मार्गदर्शन झाले. चहापानानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.



५) महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती : दि. 02/10/2020 रोजी महाविद्यालयांमध्ये महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रतिमा पूजनानंतर प्राचार्यांनी उपस्थितांना गांधीजी व शास्त्रीजी यांच्या कार्याबद्दल माहिती सांगितली.






**६) डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती :** दि. 15/10/2020 रोजी महाविद्यालयांमध्ये डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त प्रा. डॉ. एस. व्ही. राजमाने यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.



**७)** ऑनलाईन व्याख्यानमाला : Covid-19 मुळे टाळेबंदी मध्ये विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी ऑनलाइन व्याख्यानमाला घेण्यात आली. त्यामध्ये दिनांक **26/10/2020** रोजी लातूर येथील **वाटाड्या** संस्थेचे **श्री विकास कुलकर्णी** यांचे **"स्वयं रोजगाराच्या नव्या दिशा"** या विषयावर व्याख्यान झाले.दिनांक **27/10/2020**

रोजी **श्रीमती कमलताई ठकार** यांचे **“संस्कृतीचे साकार मूल्य - शांताकाकी आलुरे”** या विषयावर व्याख्यान झाले व दिनांक **28/10/2020** रोजी **श्रीमती रजिया पटेल** यांचे **“महात्मा गांधीजीच्या दृष्टिकोनातील स्त्री पुरुष समानता”** या विषयावर व्याख्यान झाले.











**८) लोकमाता आक्कांची पुण्यतिथी :** दि. 15/12/2020 रोजी शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर चे सचिव श्री सि. ना. आलुरे गुरुजी यांच्या मातोश्री कै. लक्ष्मीबाई नागप्पा आलुरे उर्फ आक्का यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिमापूजन व मार्गदर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला.



**९)साने गुरुजी जयंती :** दि. 24/12/2020 रोजी महाविद्यालयांमध्ये सानेगुरुजी जयंती निमित्त प्रतिमा पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. पूजनानंतर प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी साने गुरुजी यांच्या कार्याबद्दल माहिती सांगितली.



**१०) रक्तदान शिबिर :** दि. 29/12/2020 रोजी कै. लक्ष्मीबाई नागप्पा आलुरे व कै. सदनबाई बसवणप्पा आलुरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व कोरोना महामारी मध्ये रक्ताचा तुटवड्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी केलेल्या आव्हानामुळे महाविद्यालयात रक्तदान शिबिर घेण्यात आले. श्रीमती गोपाबाई दमाणी रक्तपेढी सोलापूर यांचे डॉक्टर, अधिकारी व कर्मचारी यांनी महाविद्यालयात येऊन 24 बाटल्या रक्ताचे संकलन केले. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी स्वतःचे 71 वे रक्तदान करून रक्तदान शिबिराची सुरुवात केली.

त्यानंतर कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ . सूर्यकांत आगलावे, प्राध्यापक, विद्यार्थी व नागरिक यांनी रक्तदान केले. सर्व रक्तदात्यांना सर्टिफिकेट बरोबर अल्पोपहार व नॅपकिन भेट देऊन व रक्तपेढीच्या कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ व नॅपकिन देऊन सत्कार केला.


















**११)** सावित्रीबाई फुले जयंती: दि. 3/1/2021 रोजी महाविद्यालयांमध्ये सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमा पूजनाचा






कार्यक्रम घेण्यात आला. प्रा. डॉ. सुरेखा भारती यांनी प्रतिमापूजन केले व नंतर सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती सांगितली.

**१२)** दि. 7/1/2021 रोजी लातूर येथील एड्सग्रस्त महिलांच्या मुलांचे संगोपन करणारे सेवालयाचे संस्थापक श्री रवी बापटले यांनी महाविद्यालयाला भेट दिली व त्यांच्या कार्याची माहिती सांगितली.





## १३) लाल बहादुर शास्त्री पुण्यतिथी :

दि. 11/01/2021 रोजी लालबहादूर शास्त्री यांच्या पुण्यतिथी निमित्ताने त्यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. पूजनानंतर प्राचार्यांनी उपस्थितांना शास्त्रीजींच्या कार्याबद्दल माहिती सांगितली. नंतर सकाळी 11 वाजता कोरोना काळात चांगले कार्य केल्याबद्दल गावातील पत्रकारांचा सत्कार करण्याचा कार्यक्रम महाविद्यालयात घेण्यात आला.







## १५) प्रजासत्ताक दिनाची पूर्वतयारी :

दि. 25/01/2021 रोजी महाविद्यालयांमध्ये 26 जानेवारी च्या प्रजासत्ताक दिनाची पूर्वतयारी करताना विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छता करून वृक्षारोपणासाठी खड्डे खणून घेतले व त्यात काळी माती टाकली तसेच पताके चिटकवून घेतले.









## १६) प्रजासत्ताक दिन :

दि. 26/01/2021 रोजी सकाळी ठीक 7:15 वाजता महाविद्यालयात ध्वजारोहणाचा कार्यक्रम घेण्यात आला. ध्वजारोहणानंतर प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले. नंतर प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी यांनी वृक्षारोपण केले. सकाळी ठीक 9 वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये सामुदायिक ध्वजारोहणाचा कार्यक्रम नूतन सरपंच माननीय श्री. रामचंद्र (दादा) आलुरे यांच्या हस्ते करण्यात आला. ध्वजारोहणानंतर काही देशभक्तीपर गीते सादर करण्यात आली व मार्गदर्शनाचा कार्यक्रम झाला.





**१७) महात्मा गांधी पुण्यतिथी :**
दि. 30/01/2021 रोजी महाविद्यालयात महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिमा पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. प्रतिमा पूजनानंतर प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना महात्मा गांधी यांच्या कार्याबद्दल माहिती सांगितली.



**१८) संत सेवालाल महाराज जयंती :**
दि.15/02/2021 रोजी संत सेवालाल महाराज जयंती निमित्त महाविद्यालयात प्रतिमा पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. पूजनानंतर प्रचार्यांनी विद्यार्थ्यांना सेवालाल महाराजांच्या कार्याबद्दल माहिती सांगितली.



**१९) रस्ता सुरक्षा अभियान :** दि. 17/02/2021 रोजी महाविद्यालयांमध्ये दिनांक 18 जानेवारी ते 17 फेब्रुवारी 2021 दरम्यान चालू असलेल्या महामार्ग पोलीस-रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमांमध्ये पोलीस




व्हॅनमध्ये बसवलेल्या कॅमेराचे प्रात्यक्षिक दाखवून रहदारीचे नियम व कायदे



विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. प्रथम प्राचार्यांनी प्रास्ताविक केले. नंतर पी.एस.आय. श्री हनुमंत कवले, श्री प्रभाकर पात्रे, श्री दिगंबर कुंभार व श्री महेश सुरवसे यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा अभियानाची माहिती सांगितली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यात आली. शेवटी कार्यक्रमाधिकारी यांनी उपस्थितांचे आभार मानले.







## २०) ग्रामपंचायत सदस्यांचा सत्कार व व्याख्यान



दि. 18/02/2021 रोजी महाविद्यालयांमध्ये अणदूर ग्रामपंचायत चे नूतन सरपंच, उपसरपंच व सदस्य यांचा कोरोना काळामध्ये गावातील घेतलेली काळजी व कार्याबद्दल सत्काराचा व मार्गदर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पंढरपूर देवस्थानचे सहअध्यक्ष माननीय श्री गहिनीनाथ महाराज औसेकर हे होते. प्रथम प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी प्रास्ताविक केले. नंतर पाहुण्यांच्या हस्ते नूतन पदाधिकारी यांचा सत्कार केला. त्यानंतर औसेकर महाराज यांनी कोरोना काळातील घ्यावयाची काळजी कशी घ्यावी हे सांगुन नूतन पदाधिकारी व उपस्थितांना मार्गदर्शन केले.


















## मोक्षप्राप्तीसाठी चांगल्या कामाची सुरुवात करा – गहिनीनाथ महाराज

अणदूर दि.१८ (प्रतिनिधी):

**दु:खाची निवृत्ती आणि चांगल्या कामाची सुरुवात म्हणजे मोक्ष! त्यामुळे नवनिर्वाचित सर्व सदस्यांनी चांगल्या कामाची सुरुवात करणे गरजेचे असल्याचे मत गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी येथील सत्कार सोहळ्यात बोलताना व्यक्त केले.**

येथील जवाहर महाविद्यालयाच्या वतीने येथील ग्रामपंचायतीच्या सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्यांच्या सत्कार सोहळ्याचे गुरुवारी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद सदस्य बाबुराव चव्हाण हे होते तर व्यासपीठावर नूतन सरपंच रामचंद्र आलुरे, उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर उमाकांत चनशेट्टी व सर्व नूतन सदस्य उपस्थित होते.

पुढे बोलताना औसेकर महाराज म्हणाले की, चांगले काम करण्यासाठी सहजासहजी बहुमत मिळत नाही त्यामुळे निर्णय घेण्यासाठी बहुमत घेण्यापेक्षा एकमताने चांगले निर्णय घेणे गरजेचे असल्याचे सांगून लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद,पंचायत समिती या निवडणूकीपेक्षा ग्रामपंचायतीची निवडणूक लढवणे हे अतिशय अवघड आहे. या निवडणूकीत विरोधक आपली कुळी मुळी काढतात तरीही निवडून आलेल्या सर्व सदस्यांनी विरोधकांना सोबत घेऊन गावचा विकास कसा करता येईल याकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे सांगितले.याप्रसंगी बाबुराव चव्हाण, रामचंद्र आलुरे यांचीही भाषणे झाली.

याप्रसंगी दर्पण दिनानिमित्त आयोजित सत्कार कार्यक्रमास अनुपस्थितीत असलेले अणदूर शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष गुरुनाथ कबाडे, कोषाध्यक्ष कैलास बोंगरगे, सदस्य लिंबाजी सुरवसे यांचाही औसेकर महाराजांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. मल्लिनाथ बिराजद-ार यांनी केले. इटकळ येथील नवनिर्वाचित सरपंच राजश्री बागडे यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. याकार्यक्रमास जवाहर महाविद्यालयाचे प्राध्यापक, जवा-हरचे शिक्षक, विद्यार्थी,गावातील प्रतिष्ठित नागरिक, व महिला उपस्थित होते



पुढारी

## नवनिर्वाचित सरपंच, उपसरपंचांचा सत्कार

**अणदूर पुढारी वृत्तसेवा :** नविर्वाचित सरपंच, उपसरपंचांचा सत्कार पंढरपूर विठल-रुक्मिणी देवस्थान समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ औसेकर महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर महाविद्यालयाच्या वतीने हा कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी जि. प. सदस्य बाबुराव चव्हाण होते. यावेळी सरपंच रामचंद्र आलुरे, वैशाली आलुरे, प्राचार्य डॉ उमाकांत चनशेट्टी, उपसरपंच डॉ नागनाथ कुंभार, नवनिर्वाचित सदस्य धनराज मुळे,डॉ जितेंद्र कानडे,बाळकृष्ण घोडके, डॉ. विवेक बिराजदार, बालाजी घुगे, गणेश सूर्यवंशी, सरिता मोकाशे, मोतनबी इनामदार, गोदावरी गुड्ड,अनसूया कांबळे, अनिता घुगरे, स्नेहा मुळे, जयश्री व्हटकर, देवकी चौधरी, उज्ज्वला बंदपट्टे आदींची उपस्थिती होती.

यावेळी चव्हाण म्हणाले की, गावची संस्कृती व इतिहास जपण्यासाठी रामचंद्र आलुरे हे नक्कीच कार्य करतील.भौतिक विकास हा होतच असतो त्यासोबत मानसिक विकास होणे आवश्यक असल्याचे भावना व्यक्त केली. केवळ गावचा विकास करण्यासाठी मी सक्रिय राजकारणात आलो आहे. गावच्या विकासाचा गाडा चालवताना सर्व समाजाला सोबत घेऊन चालवू, असे मत सरपंच रामचंद्र आलुरे यांनी यावेळी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. एम. बी. बिराजदार यांनी केले. कार्यक्रमाला इटकळच्या सरपंच राजश्री बागडे, मुख्याध्यापक सुरेश ठोंबरे, ग्रामविकास अधिकारी देविदास चव्हाण, बालाजी मोकाशे, मधुकर बंदपट्टे, गुणवंत मुळे, संतोष व्हटकर आदींची उपस्थिती होती.

अणदूर : नवनिर्वाचित सरपंच व ग्रामपंचायत सदस्य सत्कार समारंभप्रसंगी मार्गदर्शन करताना ह.भ.प गहिनीनाथ औसेकर महाराज, व्यासपीठावर प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, जि.प. सदस्य बाबूराव चव्हाण, सरपंच रामचंद्र आलुरे, वैशाली आलुरे, उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार.

Latur Edition
Feb 21, 2021 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

## २१)शिवजयंती :

दि.19/02/2021 रोजी शिवजयंती साजरी करताना महाविद्यालयात प्रतिमा पूजनाचा व मार्गदर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला प्रथम प्रा. डॉ. डी. एस. सूर्यवंशी व प्राचार्य यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. नंतर इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुनील रजपूत व प्रा. डॉ. एफ. एस. दूधभाते यांचे शिवचरित्रावर मार्गदर्शन झाले.







**२२) संत गाडगेबाबा जयंती :** दि. 23/02/2021 रोजी महाविद्यालयात संत



गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त प्राचार्यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. पूजनानंतर प्राचार्यांनी संत गाडगेबाबा यांच्या कार्याबद्दल माहिती सांगितली.

**२३)राजभाषा मराठी गौरव दिन :** दि. 27/02/2021 रोजी महाविद्यालयात वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांची जयंती राज्यभाषा मराठी गौरव दिन म्हणून साजरी





करण्यात आली. त्यानिमित्त प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी प्रतिमेचे पूजन केले. नंतर मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. संजय कुलकर्णी यांनी कुसुमाग्रज यांच्या बद्दल माहिती सांगून मराठी भाषेचे महत्त्व सांगितले.

**२४) सावित्रीबाई फुले पुण्यतिथी :** दि. 10/03/2021 रोजी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त प्रतिमापुजन प्रभारी प्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे यांच्या हस्ते करण्यात आले. पूजनानंतर लंगडे सरांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याबद्दल माहिती सांगितली.



**२५) यशवंतराव चव्हाण जयंती :** दि.12/03/2021 रोजी महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते



प्रतिमापूजन करण्यात आले. पूजनानंतर प्राचार्यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमा व्यतिरिक्त संस्थेच्या वतीने महाविद्यालयात होणाऱ्या वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला.










जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर
रक्ताभिवादन






2021-1-26 07:37

# जवाहर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,अणदूर

ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद ४१३६०३

# राष्ट्रीय सेवा योजना









## जवाहर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,अणदूर

ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद ४१३६०३

# राष्ट्रीय सेवा योजना




